PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhagyalakshmi
Year: 1962

Song: Sukuni gela baug
Lyricist: Shanta Shelke

सुकूनी गेला बाग
सुकूनी गेला बाग
आठवणींच्या मुक्या पाकळया
आठवणींच्या मुक्या पाकळया
पडल्या जागोजाग
पाकळया पडल्या जागोजाग
सुकूनी गेला बाग

आज फुलांतून सुगंध उडले
पाचोळ्यातच पाऊल बुडले
आज फुलांतून सुगंध उडले
पाचोळ्यातच पाऊल बुडले
जुन्या हरवल्या पाऊलवाटा
जुन्या हरवल्या पाऊलवाटा
कसा काढणे माग
माग कसा काढणे माग
सुकूनी गेला बाग

या तरूखाली एकामेकां
दिल्या घेतल्या आणाभाका
या तरूखाली एकामेकां
दिल्या घेतल्या आणाभाका
पानासंगे आशा जाळीत
पानासंगे आशा जाळीत
ये ग्रीष्माची आग
ये ग्रीष्माची आग
सुकूनी गेला बाग

पालवीतली विटली नक्षी
झाडावरती मुकेच पक्षी
पालवीतली विटली नक्षी
झाडावरती मुकेच पक्षी
गीत गळ्यातच घुटमळले
गीत गळ्यातच घुटमळले
त्या पुन्हा न येई जाग
जाग पुन्हा न येई जाग
सुकूनी गेला बाग
सुकूनी गेला बाग

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*